मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# डीबीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचा लाभ

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या यशस्वी अंमलबजावणी : 49,000 विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटपाचा थेट लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण उपक्रम सुरू केला. विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा हा उद्देश असलेल्या उपक्रमातून आत्तापर्यंत शाळेमध्ये उपस्थित असणाऱ्या तब्बल ४९,००० विद्यार्थ्यांना रेनकोट, शूज, शालेय साहित्याच्या किटचे यशस्वीपणे वितरण करून एक म त्वाचा टप्पा पार केला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने बँक ऑफ बडोदाच्या सहकार्याने, डिजिटल ई-रूपी पेमेंट प्रक्रिया राबविल्यामुळे साहित्य वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहून उपक्रम यशस्वीरीत्या राबविला जात आहे.



'डीबीटी ई-व्हाऊचर प्रणाली'द्वारे माझ्या मुलाला पूर्ण शालेय साहित्य मिळाले. मागील वर्षीपेक्षा या वर्षीची योजना योग्य आहे', 'मुलाचे शालेय साहित्य घेऊन जाण्याबाबत मला मेसेज आला आहे. मी उद्या साहित्य घ्यायला जाणार आहे. पण, या योजनेत आणखी पारदर्शकता यायला हवी,' 'ठेकेदारविरहित योजना राबवावी.' या भावना आहेत महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या. महापालिका विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य डीबीटीच्या (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर अर्थात थेट लाभ हस्तांतरण) माध्यमातून देत आहे. त्याबाबत पालकांनी त्यांची मते व्यक्त केली.विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशाने महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. त्यातून आतापर्यंत ४९ हजार विद्यार्थ्यांना रेनकोट, शूज, शालेय साहित्याच्या किटचे यशस्वीपणे वितरण करून एक टप्पा पार केला आहे. महापालिका शिक्षण विभागाने बँक ऑफ बडोदाच्या सहकार्याने डिजिटल ई-रुपी पेमेंट प्रक्रिया राबविल्याने साहित्य वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राहून उपक्रम यशस्वीरीत्या राबविला जात असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. मात्र, या उपक्रमाबाबत काही पालक खूष असून काहींनी नाराजी व्यक्त केली आहे. काहींनी योजना आणखी प्रभावी राबविण्याची तर, काहींनी डीबीटी प्रक्रियेतून ठेकेदार पद्धती बंद करण्याची मागणी केली.

### साहित्याचे टप्प्याटप्प्याने यशस्वी वितरण

» डीबीटी च्या पहिल्या टप्प्यामध्ये अंदाजे ३९,००० उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांनासाहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले, तर उर्वरित १०,००० शाळेत उपस्थितअसणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या टप्प्यामध्ये किटचे वाटप करण्यात आले असून ज्यांनीशाळेमध्ये उशिरा प्रवेश घेतला अशा विद्यार्थांचा दुसऱ्या टप्प्यामध्ये समावेश करण्यात आला.

> चालू शैक्षणिक वर्षामध्ये डीबीटी च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आम्हाला आमच्याविद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे साहित्य पुरवता आले आहे. ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्यात आला असून याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे. चालू वर्षी यशस्वी झालेल्या उपक्रमामुळे भविष्यामध्येही प्रत्येक विद्यार्थ्याला अशा उपक्रमांचा लाभ होणार असून यापुढे यापेक्षा जलद आणि अधिक कार्यक्षम प्रक्रियाराबवू असा आम्हाला विश्वास आहे
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# अठरा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## ठेकेदारांच्या निकृष्ट कामांमध्ये सहभाग, कर्तव्य विसरल्याने शिस्तभंगाची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील स्थापत्य विभागाची कामे निकृष्ट व दर्जाहीन करणाऱ्या ठेकेदारांची बिले काढण्यास मदत करणाऱ्या १८ अधिकाऱ्यांना महापालिकेने कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे. यात १० कनिष्ठ अभियंता आणि ८ उपअभियंत्यांचा समावेश आहे.

कर्तव्य आणि जबाबदारी विसरून बिले काढण्यास ठेकेदारांना मदत करत अप्रत्यक्षपणे अशा कामामध्ये सहभाग नोंदविल्याने या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

स्थापत्य विभागातील अधिकारी, राजकारणी आणि ठेकेदारांनी मिळून निकृष्ट व दर्जाहीन कामे केली. यातून त्यांनी पालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारला. यातील अकरा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकत कामांच्या दुप्पट रक्कम वसूल करण्यात येणार आहे. या कामावर देखरेख करणारे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंत्यांवर कारवाई न करता मोकाट सोडले होते.



शहर अभियंता मकरंद निकम यांनी त्या वृत्ताची दखल घेऊन १८ कनिष्ठ अभियंता, उपअभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे. महापालिकेच्या स्थापत्य विषयक कामात ४० ते ४५ टक्के पेक्षा कमी दराने ठेकेदारांनी निविदा भरून निकृष्ट कामे करत लाखो रुपयांची बिले लाटली आहेत. महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून आठही क्षेत्रीय कार्यालयात विविध कामे करण्यात येतात. तसेच केलेल्या कामाच्या देखभालीची कामे करण्यात येतात.

महापालिकेच्या स्थापत्य विभागातील रस्ते दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक, मातीचे जॉगिंग ट्रॅक यासारखी कामे घेताना ११ ठेकेदारांनी १४ विकास कामात तब्बल ४० ते ४५ टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या. एवढ्या कमी दरात कामे घेतल्यानंतर त्याचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहिली का? याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना खातरजमा करायची होती. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी ११ ठेकेदारांच्या १४ कामाचा दर्जा अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ( सीओईपी) यांच्याकडून तपासण्याचे आदेश महापालिका दक्षता व नियंत्रण विभागाला सप्टेंबर २०२२ मध्ये दिले होते.

# सफाई सेवकांच्या वेतनास कार्योत्तर मान्यता

## 79 सफाई सेवक काम करत असल्याचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांचे मदतनीस म्हणून ७८ सफाई सेवक आणि १ निवासी रखवालदार असे ७९ कर्मचारी सहा महिन्याचा करारनामा करुन कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आले.



प्रति सफाई सेवकाला दरमहा १३ हजार ६०५ एवढे वेतन दिले जाते. ७९ सफाई सेवक आणि निवासी रखवालदाराचे सहा महिन्याच्या वेतन रक्कमेपोटी येणा-या ६४ लाख ४८ हजार ७७० एवढा खर्च येत असून आयुक्तांनी त्यास कार्योत्तर मान्यता दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्राथमिक विभागाच्या शहरात १०८ शाळा आहेत. शाळेतील दैनंदीन स्वच्छता करणे, हजेरी नोंद घेणे, परिपत्रक फिरविणे, शालेय पोषण आहार वाटप करणे, बेल वाजविणे आदी कामे करण्यासाठी कर्मचा-यांची कमतरता भासत होती.

त्यावर शाळेतील मुख्याध्यापकांच्या मागणीनुसार तसेच कामगार कल्याण विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार मुख्याध्यापकांना मदतनीस म्हणून ७८ सफाई सेवक आणि १ निवासी रखवालदार अर्धवेळ कर्मचारी म्हणून सहा महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात आले.

२६ डिसेंबर २०२३ ते २६ जून २०२४ या सहा महिने कालावधीत तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीस आयुक्त शेखर सिंह यांनी २० जून २०२४ रोजी मान्यता दिली.

या सहा महिने कालावधीसाठी कामगार कल्याण विभागाच्या आदेशानुसार एका महिन्याच्या वेतनास प्रत्येक कर्मचा-याला १३ हजार ६०५ एवढे वेतन दिले जाते.

# बाल गणेश मंडळांमुळे मुलांच्या कौशल्याला मिळते चालना

## उत्सवातील विविध कार्यक्रमांमुळे कल्पकतेला वाव, वाईट संगत, टीव्ही, स्मार्ट फोनपासून दूर राहण्यास मदत

**पुणे | प्रतिनिधी**

कोणत्या ना कोणत्या मार्गाने सहभागी होण्याची तीव्र इच्छा असलेल्या गणेशोत्सवाची प्रत्येकजण वर्षभर आतुरतेने प्रतीक्षा करत असतो. अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्याचे महत्त्व सामान्यांना कळावे, समाजातील भेदाभेद दूर करून एकता निर्माण करावी आणि त्याच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला एक गती देता यावी यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती कार्यक्रमांना सुरुवात केली.

१८९३ नंतर सार्वजनिक गणेशोत्सवाने समाजाच्या विविध स्तरामध्ये आपली मुळे घट्ट केली असल्याने विविध मंडळे, संघटना, सोसायट्यांमध्ये आता हा उत्सव साजरा केला जातो. एवढेच नव्हे तर लहान मुलेही आता आपला वेगळा गणेशोत्सव साजरा करत असून त्याद्वारे त्यांना आपल्यातील कौशल्य वाढविण्याची, सर्जनशीलता जपण्याची संधी मिळत आहे. गणेशोत्सवामुळे त्यांना वाईट संगती टाळण्याबरोबर टीव्ही, स्मार्ट फोनच्या व्यसनापासून अलिप्त राहण्यास मदत करत आहे.

एरंडवणेतील श्री शनी मारुती बालगणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सचिन पवार याबाबत म्हणाले, समाजाच्या प्रगतीचा भाग बनावे आणि झोपडपट्टी भागातील मुलांनी एकत्र यावे यासाठी ४४ वर्षांपूर्वी माझ्या आजोबांनी या मंडळाची स्थापना केली. आम्ही सामाजिक कार्य तर करतोच, त्याशिवाय उत्सव काळात ५२ विविध प्रकारचे कार्यक्रमही घेतो. गणेशोत्सव हा केवळ नाचण्याचा, मोठ्या आवाजातील धांगडधिंग्याचा सण नाही तर हा उत्सव समाजासाठी काहीतरी सकारात्मक कार्य करण्याचा उत्सव आहे.

लेखन कौशल्याबाबत आम्ही एक अभ्यासशाळा घेतली तेव्हा मी ५ व्या इयत्तेत शिकत होतो. प्रत्येक वर्षी आम्ही पथनाट्य आयोजित करतो. या पथनाट्याचा विषय मुलेच निवडतात. यातील बहुतेक नाट्ये इतिहास, विज्ञान, आणि अन्य विषयावरील असतात. यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आमच्या मंडळात २५ मुले असून ते उत्सव काळात वेगवेगळी जबाबदारी उचलतात, तसेच आमच्या अन्य कार्यक्रमातही ते सहभागी होतात. यावर्षी आम्ही दुधाच्या भेसळीबाबत सामाजिक जनजागृती तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.

कसबा पेठेतील केदारेश्वर मित्र मंडळ हे असेच एक बालगणेश मंडळ आहे. सोळा वर्षांपूर्वी ओंकार तावरे यांनी आपल्या मित्रासमवेत या मंडळाच्या कार्याला सुरुवात केली. ते आपल्या अनुभवाबाबत म्हणतात, लहान मुले अतिशय सक्रिय असतात आणि त्यांना नवनवीन बाबी जाणून घेण्याची मोठी जिज्ञासा असते. तसेच आपल्यातील ऊर्जा कोणत्या ना कोणत्या कामी वापरात आणायचे त्यांना मोठे वेड असते.

एक गोष्ट आमच्या निदर्शनास आली असून त्यामध्ये अनेकांना काही गोष्टी करावयाच्या असतात, मात्र त्यांना वयामुळे परवानगी मिळत नसल्याने ते अतिशय नाराज असतात. त्यामुळे अशा लोकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावयाचे.



### देव-देवतांचे पोशाख, कार्यक्रमाचे नियोजन

» देखाव्यातील देव-देवतांचे पोशाख, कार्यक्रमाचे नियोजन अशा अनेक गोष्टींचा निर्णय आमच्या मंडळातील मुले त्यांच्या जबाबदारीवर घेतात. हे कोवळे वय असल्याने या वयात नकाराच्या जाळ्यात सापडणे धोकायदाक ठरते. तसेच वाईट संगतही त्यांच्या भविष्यावर वाईट परिणाम घडवू शकते. या मुलांच्या विचारांना दिशा देण्याचे, त्यांना तशा विचाराचे काम देण्याचे काम आम्ही करतो. उत्सवाला प्रारंभ होण्यापूर्वी जवळ जवळ दीड महिना अगोदर आम्ही कामास सुरुवात करतो. बैठकीचा वृत्तांत लिहिणे, परवानगीसाठी अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे, पत्राचा मसुदा तयार करणे, फलकाचा मसुदा, त्याची छपाई आदी कामांमध्ये मुले सक्रिय भाग घेतात.

### गणेशोत्सवातील सहभागामुळे मुलांमध्ये मोठे बदल

» त्यांचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव वैशिष्ट्य बदलले आहे. मुले आरती म्हणतात, भागामध्ये घरोघरी प्रसाद वाटतात. मोठमोठी मंडळे कसे देखावे करतात, याचे निरीक्षण करून ही मुलेही तशाच प्रकारचे देखावे त्यांच्या मंडळात उभारतात. गणेशोत्सवातील सहभागामुळे मर्यादित साधनसंपत्तीत आपल्यातील कोशल्याला कशी संधी देता येईल, कल्पकतेला कसा वाव देता येईल याचा विचार ते नेहमी करतात. त्यांच्यात घडलेला हा मोठा बदल भावी आयुष्यात कामी येतो.

### गम्मत शाळेचा उपक्रमाचा

» सुरुवातीला मातीच्या गणेश मूर्तीची निर्मिती करत असू. तेथेच आम्हाला मंडळाची स्थापना करण्याचा विचार सुचला. त्यामुळे प्रत्येक झोपडपट्टीत मुले मातीची गणेशाची मूर्ती बनवतात आणि उत्सवही मोठ्या आनंदात, उत्साहात साजरा करतात. तेथे जात, धर्माची कोणतीही आडकाठी नसते. झोपडपट्टीतील सर्व थरातील मुले जात-धर्म विसरून एकत्र येतात आणि छोटा मंडप उभारतात. गेल्या चार दशकांपासून मुले एकत्र येतात आणि दहा दिवसांचा सण साजरा करतात.

# ढोल-ताशा पथकांना 'सुप्रीम' कोर्टाचा मोठा दिलासा

## सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिला आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील ऐतिहासिक गणेश विसर्जन मिरवणूक म्हंटली तर ढोल-ताशा आलेच. या ढोल ताशांचा आवाज अगदी गगनाला भिडतो. पुण्यात गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान अत्यंत उत्साहाचे वातावरण असते. या वैभवशाली मिरवणुका पाहण्यासाठी देश-विदेशातील पाहुणे पुण्यात येत असतात. पण हरित लवादाच्या एका निर्णयामुळे ढोल-ताशा पथकांच्या उत्साहाला मर्यादा येणार होत्या. मात्र आता सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी एक मोठा निर्णय घेत ढोल-ताशा पथकांना मोठा दिलासा दिला आहे.

राष्ट्रीय हरित लवादाने (पश्चिम झोन) गणेश विसर्जन ढोल-ताशा-झांज पथकांमधील वादकांच्या संख्येला मर्यादा घातली होती. या पथकांमध्ये 30 पेक्षा अधिक सदस्य असणार नाहीत, असे आदेश लवादाने दिले होते. ही जबाबदारी पोलिसांवर सोपवण्यात आली होती. या आदेशाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्यायाधीश जे. बी. पारदीवाला, मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर गुरूवारी दुपारी सुनावणी पार पडली.



यावेळी न्यायालयाने एनजीटीच्या आदेशाला स्थगिती दिली. त्यामुळे आता ढोल-ताशा पथकांवर किती सदस्य असावेत, याची कोणतीही मर्यादा असणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. ढोल-ताशा पुण्याचे हृदय असल्याचे सांगत सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी त्यांना ढोल-ताशा वाजवू द्या, असे स्पष्ट केले आहे. तसेच उत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी एनजीटीने जारी केलेल्या इतर निर्देशांना विरोध नसल्याचेदेखील न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

एनजीटीने 30 ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने विसर्जन मिरवणुकीदरम्यान रिअल टाईम ध्वनी प्रदुषण मोजावे. उत्सवातील लाऊड स्पीकरच्या मर्यादेबाबतही लवादाने आदेश दिले होते. त्याचप्रमाणे पोलिसांनी ढोल-ताशा-झांज पथकात 30 पेक्षा जास्त सदस्य असणार नाहीत, याची खात्री करावी, अशा सुचना एनजीटीने दिल्या होत्या. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास पोलिसांनी साहित्य जप्त करावे, असेही आदेशात म्हटले होते. मिरवणुकीत डोल आणि डीजेच्या वापरावरही एनजीटीने निर्बंध आणले आहेत.

# जया किशोरी यांच्या हस्ते श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची आरती

## हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीला भेट देऊन बाप्पाची आरती केली

**पुणे | प्रतिनिधी**

भारतातील प्रसिध्द आध्यात्मिक कथाकार आणि भजन गायिका जया किशोरी यांनी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीला भेट देऊन बाप्पाची आरती केली. यावेळी उत्सवप्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन व भाविक उपस्थित होते.

'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती'च्या दर्शनासाठी हजारो भक्तांबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवर हजेरी लावत आहेत. रात्री आठ वाजता बाप्पाची आरती असते. यावर्षी ट्रस्टने बाप्पाची रात्रीची आरती प्रामुख्याने आधात्मिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांचा हस्ते करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मंगळवारी आध्यात्मिक कथाकार तथा प्रसिद्ध भजन गायिका जया किशोरी यांच्या हस्ते बाप्पाची आरती झाली. यावेळी ट्रस्टचे उत्सवप्रमुख व विश्वस्त पुनीत बालन यांनी किशोरी यांचे मोदकाची प्रतिकृती देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपतीच्या आरतीचा मान दिल्याबद्दल ट्रस्टचे आभार मानले. दरम्यान आरती कार्यक्रमाआधी ढोल-ताशा पथकाने केलेल्या वादनाचाही जया किशोरी यांनी आनंद घेतला आणि त्या अक्षरशः त्यात दंग होऊन गेल्या होत्या.



भारतातील प्रसिध्द आध्यात्मिक कथाकार आणि भजन गायिका जया किशोरी यांनी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीला भेट देऊन बाप्पाची आरती केली.

# महापालिका शाळेमध्ये झिरो वेस्ट कचरा मोहीम

## प्राथमिक, माध्यमिक शाळेत 4 टप्प्यांमध्ये राबविणार उपक्रम : 97 शाळा कचरामुक्त करणार






**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना लहानपणापासून कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी, त्यांची कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी, याकरिता महापालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये झिरो वेस्ट कचरा मोहीम राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समिती सभेत मान्यता दिली. एकूण ९७ शाळा या उपक्रमाअंतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत.

शहरात स्वच्छ पिंपरी चिंचवड शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पालिकेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिकेच्या शाळा कचरामुक्त व्हाव्यात, याकरिता प्राथमिक व माध्यमिक शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा (झिरो वेस्ट शाळा) हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाचा भाग म्हणून पालिकेच्या आरोग्य विभागामार्फत झिरो वेस्ट शाळा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती करून त्यांच्यात लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे.

महापालिकेच्या शाळांमध्ये तीन महिन्यांमध्ये एकूण ४ टप्प्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी शाळांना निधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण ९७ शाळा या उपक्रमाअंतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने या विशेष बैठकीमध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला होता, त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

### 20 शिक्षकांची सेवा पालिकेत

» जिल्हा परिषद पुणे यांच्याकडील २० शिक्षकांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतच्या विषयालाही प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. राज्य शासनाच्या नगर विकास विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार विहित तरतुदी, न्यायालयीन प्रकरणे व इतर सर्व प्रचलित नियम या बाबींचे पालन करून वर्गीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यालाही आयुक्त सिंह यांनी मान्यता दिली.

### मंजूर विषय

» महापालिकेचे रस्ते, उद्याने, मोकळ्या जागा, चौक या ठिकाणी लागवडीसाठी हंगामी रोपे पुरविणे, महिला बचत गटाद्वारे सामुदायिक शौचालयांचे साफसफाई व देखभाल करणे, आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणे, तसेच विविध विभागातील आवश्यक कामांसाठी तरतूद वाढवणे, घट आणि वर्गीकरण करणे, शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ च्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देणे अशा विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# विद्यार्थ्यांनी बनविल्या इको फ्रेंडली मूर्ती

## 41 शाळांनी घेतला भाग : महापालिकेच्या पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मितीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती व सजावट स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशा इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवल्या. त्यांनी गणेश बाप्पाची केलेली सजावटदेखील आकर्षक होती. यातून विद्यार्थ्यांची सृजनशीलता आणि कल्पकतेचा परिपाक दिसून आला.

विद्यार्थ्यांनी शाडूच्या माती, लाकडाचा भुसा, कागदाचा लगदा, अगदी झाडांच्या पानांपासूनही इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनवल्या होत्या. या पर्यावरण मूर्ती निर्मितीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महापालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. शाळांतील ५ वी १० वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित केली होती.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बनविलेल्या मूर्तींचे प्रदर्शन चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, अजिंक्य येळे, किशोर ननावरे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी पर्यावरणपूरक उत्सव साजरे करणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने महापालिकेकडून शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शहरातील नागरिकांचा देखील उपक्रमास प्रतिसाद मिळत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती व सजावट' या स्पर्धेत ४१ शाळांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत सहभागी शाळांतील विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशा पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविल्या. मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक माती, बांबू आणि लाकडाचे तुकडे, उसाच्या काड्या तसेच तुरटीमध्ये मिसळलेल्या चिकणमातीचा वापर केला होता. मूर्ती रंगविण्यासाठी नैसर्गिक रंगांचा वापर करण्यात आला होता. सजावटीसाठी जे साहित्य मुलांनी वापरले होते त्यातही नैसर्गिक फुले, पाने, कागद, धागे, शाश्वत, नैसर्गिकरित्या विघटन होणा-या वस्तू, नालीदार चादरी, कापड, लाकूड, बांबू आदी साहित्याचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीमचे सुंदर सादरीकरण केले.

पर्यावरणास अनुकूल तत्त्वांचे पालन तसेच पर्यावरणावर एकूण परिणाम तत्त्वावर आधारित इको फ्रेंडली गणेश मूर्तींचे मूल्यांकन करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, अजिंक्य येळे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, प्रज्ञा ठाकूर आणि योगेश आल्हाट यांनी केले.

# अखेर फुरसुंगी, उरुळी देवाची नगरपालिकेला मान्यता

## राज्य शासनाने काढली अधिसूचना : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका हद्दीतून वगळण्याचा निर्णय




**पुणे | प्रतिनिधी**

बहुचर्चीत फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांसाठी एक स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याचा अखेर राज्य शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या दोन गावांना पुणे महापालिका हद्दीतून वगळण्यात येणार असून त्यांच्यासाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन केली जाणार आहेत. फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे २०१७ मध्ये महापालिकेत समाविष्ट करण्यात आली होती. महापालिकेने आकारलेला कर जास्त असल्याने आणि कोणत्याही सुविधा मिळत नाहीत, अशी तक्रार करत या गावांनी महापालिकेतून वगळण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ६ डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या बैठकीत केली होती. त्यानुसार यावर राज्य सरकारकडून विचार करण्यात येत होता.

लोकसंख्येनुसार 'ब' वर्ग नगरपालिका करता येऊ शकते, असा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून राज्य सरकारकडे सादर करण्यात आला होता. त्यामुळे आता या दोन गावांबाबतचा निर्णय राज्य सरकारच्या कोर्टात गेला असून, त्यावर सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. न्यायालयात सरकारने ही दोन गावे महापालिकेत असल्याचेही प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यामुळे या गावांमध्ये विकास कामे ही महापालिकेकडूनच केली जात होती.

मुख्यमंत्री शिंदे यांनी फुरसुंगी, उरुळी देवाची ही गावे महापालिका हद्दीत वगळण्याचे आणि या दोन गावांची स्वतंत्र नगरपालिका करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार जिल्हा प्रशासनाकडे नागरिकांनी हरकती-सूचना नोंदविण्याचे आवाहन केले होते. महिनाभराच्या मुदतीत जिल्हा प्रशासनाकडे साडेचार हजारांहून अधिक हरकती-सूचना प्राप्त झाल्या होत्या.

महापालिकेकडून तातडीने विकास आराखडा होऊ शकतो. महापालिकेने या गावांमध्ये नगररचना योजना जाहीर केली आहे. ती रद्द होऊ शकते. त्यामुळे ही गावे महापालिकेच्या हद्दीतच ठेवावीत, अशी बाजू २ हजारांहून अधिक नागरिकांनी मांडली होती. स्वतंत्र नगरपालिकाही या हद्दीचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करू शकते. विकासकामांसाठी राज्य सरकारकडून स्वतंत्र निधी मिळू शकतो. चांगले प्रशासन देता येऊ शकते, त्यामुळे या दोन्ही गावांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी, असे सांगत राज्य सरकारच्या निर्णयाचे समर्थन २ हजार ३०० हून अधिक नागरिकांनी केले होते. त्यावर जिल्हा प्रशासनाकडून या दोन्ही गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबतचा अहवाल राज्य सरकारला सादर करण्यात आला होता.

### निर्णयाविरोधात हायकोर्टात जाणार

» आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय राजकीय ठरणार आहे. या निर्णयाविरुद्ध या गावांतील काही नागरिक पुन्हा उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. दोन्ही गावांचा समावेश महापालिकेतच असावा, अशी त्यांची मागणी आहे.

### गावांची लोकसंख्या

- » दोन्ही गावांची मिळून एकूण लोकसंख्या : ७५ हजार ४०५
- » फुरसुंगी गावची लोकसंख्या : ६६ हजार २
- » उरुळी देवाची गावची लोकसंख्या : ९ हजार ४०३
- » 'ब' वर्ग नगरपालिकेसाठी लोकसंख्येसाठीची अट : ७५ हजार

# पुणे जिल्ह्यातील 4 तालुक्यांना दिलासा मिळणार?

## जिल्ह्यातील गावांच्या पाणीयोजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करा : अजित पवारांचे निर्देश



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील घेरा, सिंहगड आणि प्रयागधाम, आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक, बारामती तालुक्यातील नीरावागज, खांडज, घाडगेवाडी तसेच इंदापूर तालुक्यातील बोरी या गावातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या गावांना भेट द्यावी. भौगोलिक परिस्थिती आणि शाश्वत जलस्त्रोतांचा अभ्यास करुन सर्वोत्तम व्यवहार्य पर्याय सुचवावा. या गावांची पुढील 50 वर्षांची गरज लक्षात घेऊन पाणीयोजनांचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने पाठवावा. या योजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे आणि दूरदृश्यप्रणालीद्वारे पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, नवीन प्रस्ताव तयार करताना धरणातून बंद पाईपद्वारे पाणी आणणे किंवा नवीन साठवण तलाव बांधणे यासारख्या पर्यायांचाही विचार करावा. सध्याच्या अस्तित्वातील साठवण तलावाची दुरुस्ती, अशुद्ध पाणी गुरुत्वनलिका, अशुद्ध पाणी उद्धरणनलिका, पंपिंग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, अस्तित्वातील जल शुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती, शुद्ध पाणी ऊर्ध्वनलिका, उंच जलकुंभ, संतुलनटाकी, वितरण व्यवस्था, सौरऊर्जेसारख्या अपारंपरिक स्त्रोतांचा वापर, तसेच इतर अनुषंगिक कामांचा नव्या योजनेत समावेश करून, अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा. या प्रस्तावाचा शासनस्तरावर अभ्यास करुन त्यास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. जिल्ह्यातील गावांच्या पाणीयोजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

### कांबळेश्वर येथे नव्या, पक्क्या साठवण तलावास मंजुरी

» बारामती तालुक्यातील मौजे कांबळेश्वर येथील मातीच्या साठवण तलावातून कांबळेश्वर-शिरवली-शिरष्णे-लाटे-माळेवाडी या पाच गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. या साठवण तलावाचे बांधकाम जीर्ण झाले असल्याने मोठ्या प्रमाणावर गळती होते. या साठवण तलावाचे बांधकाम नव्याने आणि पक्क्या स्वरुपात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही अजित पवार यांनी दिले.